मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील सर्व मतदारांनी मतदान करावे; अथर्व सुदामे

## नाट्य रसिकांनी घेतली 15 जानेवारीला 100 % मतदान करण्याची शपथ

**पिंपरी | प्रतिनीधी**

आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी शपथ चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात नाट्य रसिकांनी घेत येत्या १५ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत मतदान करण्याचा निर्धार केला.



पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 'अथर्व सुदामे लाईव्ह...' या नाट्यप्रयोगाच्या वेळी मतदान जनजागृती उपक्रम जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला.

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य असल्याचा संदेश देत नाट्य रसिकांनी उत्स्फूर्तपणे मतदानाची शपथ यावेळी घेतली. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या नाट्यप्रेमींनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार व्यक्त करत आगामी महापालिका निवडणुकीत नक्की मतदान करण्याचा निर्धार केला.

मनोरंजनासोबतच सामाजिक जाणीव जागृत करणारा हा उपक्रम प्रेक्षकांनी विशेष कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त केली. सांस्कृतिक मंचाच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा होता.

> “ पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीकरिता मतदान १५ जानेवारी रोजीआहे. या निवडणुकीकरीता शहरातील सर्व मतदारांनी १००% मतदान करून लोकशाहीने दिलेला पवित्र हक्क बजावून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.
>
> **- अथर्व सुदामे, (रिल स्टार)**
> **सुप्रसिद्ध सोशल मिडिया एन्फ्लुएन्सर.**

# उमेदवारांनी सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक

## जनता संपर्क विभागात प्रसार माध्यम व सनियंत्रण समिती कार्यालयाची स्थापना

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने उमेदवारांच्या निवडणूक प्रचारासाठी प्रसारित होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती, सोशल मीडिया प्रचार, तसेच इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील जाहिरातींसाठी पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती कार्यालयाकडे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे, अशी माहिती समितीचे सदस्य सचिव किरण गायकवाड यांनी दिली आहे.




उमेदवार व राजकीय पक्षांकडून निवडणूक काळात पेड न्यूज, द्वेषपूर्ण मजकूर, आचारसंहितेचा भंग करणाऱ्या जाहिराती प्रसारित केल्या जाऊ नये, यासाठी प्रसार माध्यम व सनियंत्रण समिती अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून सर्व माध्यमांवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे. तसेच कोणतीही जाहिरात समितीच्या पूर्वप्रमाणनाशिवाय प्रसारित करू नये.राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

समितीचे मध्यवर्ती कार्यालय पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील माहिती व जनसंपर्क विभागात कार्यान्वित झाले आहे. प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी जाहिरात प्रसारित करण्याच्या विहीत वेळेत समितीकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची माहिती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच क्यूआर कोडद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित क्यूआर कोड सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये बॅनर स्वरूपात लावण्यात आलेले आहेत.

समितीकडे पूर्वप्रमाणन करीता आलेल्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांकडे राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जाहिरातीत सुचवलेले बदल, दुरुस्त्या किंवा वगळणे उमेदवार किंवा संबंधित राजकीय पक्षावर बंधनकारक राहतील. पूर्वप्रमाणन मंजूर झाल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येईल अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# जनसेवेचा ध्यास आणि विकासाचा वारसा

## कुंदन अंबादास गायकवाड यांचा सुसज्ज प्रभागाचा संकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली परिसरात आपल्या कर्तृत्वाने आणि जनसंपर्काने वेगळी ओळख निर्माण करणारे नेतृत्व म्हणजे कुंदन अंबादास गायकवाड. भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक म्हणून त्यांनी प्रभाग क्रमांक १ चिखली परिसरात विकासाची गंगा पोहोचवली आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली, "विकसित प्रभाग" आणि "शेवटच्या घटकाचा विकास" हे ध्येय उराशी बाळगून ते आता प्रभाग क्रमांक ११ मधून नव्या जिद्दीने निवडणुकीला सामोरे जात आहेत.

कुंदन गायकवाड यांनी केवळ पायाभूत सुविधांवरच नव्हे, तर समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या सक्षमीकरणावर भर दिला आहे. त्यांच्या संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून त्यांनी काम केले.४ हजारांहून अधिक नागरिकांना 'आयुष्मान भारत' कार्डाचे वाटप केले. मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ गरजू महिलांपर्यंत पोहोचवयला. गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिले. रेशन कार्डाशी संबंधित अडचणी सोडवणे आणि प्रशासकीय कामात नागरिकांना थेट सहकार्य केले.



### सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी..

केवळ विकासकामेच नव्हे, तर समाजाला एकत्र गुंफण्याचे काम गायकवाड यांनी केले आहे. दहीहंडी उत्सव, आरोग्य शिबिरे, महिलांसाठी 'होम मिनिस्टर' कार्यक्रम आणि बचत गटांच्या माध्यमातून त्यांनी महिलांचे संघटन केले. तसेच कबड्डी, क्रिकेट आणि व्हॉलीबॉल यांसारख्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून तरुण पिढीला व्यासपीठ मिळवून दिले आहे.

"प्रभाग बदलेला असला, तरी विकासाचा झंझावात कायम राहणार आहे," अशा शब्दांत कुंदन गायकवाड आपला विश्वास व्यक्त करतात. छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जपत, सुसज्ज आणि आदर्श प्रभाग बनवण्यासाठी ते कटिबद्ध आहेत. "तुमची साथ आणि आशीर्वाद पाठीशी राहू द्या... तुमच्या घरातील हक्काचा नगरसेवक म्हणून मी सदैव आपल्या सेवेत असेन." असा विश्वास कुंदन गायकवाड या माध्यमातून व्यक्त करत आहेत.

### प्रगतीची पाऊले: पूर्ण झालेली प्रमुख कामे

» जलशुद्धीकरण: १०० एमएलडी क्षमतेचा चिखली जलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण करून पाणी पुरवठा सक्षम केला.
» शिक्षण आणि अध्यात्म: चिखली येथे देशातील पहिले 'जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ' साकारण्यात मोलाचा वाटा उचलला.
» पायाभूत सुविधा: चिखली टाऊन हॉल, भव्य प्रवेशद्वार, अद्ययावत स्मशानभूमी आणि पिंपळे रस्ता ते शाइन सिटी चौक रस्त्याचे काम पूर्ण केले.

### 'घरकुल' आणि 'पूर्ण नगर' परिसराचा कायापालट

» गायकवाड यांच्या आगामी कार्यकाळातील सर्वात महत्त्वाचा अजेंडा हा 'घरकुल' आणि 'पूर्ण नगर' परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवणे हा आहे. आमदार महेशदादा लांडगे यांनी विधानसभेत मांडलेल्या लक्षवेधीचा पाठपुरावा करून घरकुल मधील नागरिकांची मालमत्ता करावरील थकबाकी माफ करून घेण्यासाठी ते स्वतः लक्ष घालणार आहेत. घरकुल परिसरात केवळ घरे असून सुविधांची वानवा आहे. तिथे उद्यान, सुसज्ज रस्ते, जॉगर्स ट्रॅक, वाचनालय, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र आणि सुरक्षारक्षक पुरवण्याचे त्यांचे स्वप्न आहे. पूर्ण नगर आणि शिर्के बिल्डिंग परिसरातील जुने विजेचे डीपी बॉक्स बदलणे आणि सांडपाण्यासह पावसाच्या पाण्यासाठी 'स्टॉर्म वॉटर लाईन'चे जाळे अधिक सक्षम करण्यावर त्यांचा भर असेल. प्राधिकरणातील मोकळ्या जागांवर वाहनतळविकसित करून रस्त्यावरील पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडवण्याचा त्यांचा निर्धार आहे.

# प्रभाग 11 च्या विकासासाठी वकील मयुरी साने मैदानात

## परिवर्तनाचा निर्धार करत प्रचाराचा धडाका

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक ११ मध्ये परिवर्तनाचे वारे वाहू लागले असून, वकील मयुरी निलेश साने यांनी आपल्या प्रचाराचा झंझावात सुरू केला आहे.

आपल्या जनसंपर्क मोहिमेची सुरुवात त्यांनी स्थानिक मंदिरामध्ये दर्शन घेऊन आणि परिचय पत्रक देवाचरणी अर्पण करून केली. यावेळी उपस्थित वडीलधाऱ्या मंडळींचे आशीर्वाद घेऊन त्यांनी प्रत्यक्ष निवडणूक प्रचाराला जोरदार सुरुवात केली.



मयुरी साने यांनी आपल्या प्रचारादरम्यान प्रामुख्याने महिला आणि तरुणांच्या रोजगाराच्या व सुरक्षेच्या प्रश्नांना हात घातला आहे. परिसरातील मूलभूत नागरी समस्या आणि प्रलंबित प्रश्नांवर त्यांनी मतदारांशी थेट संवाद साधला. त्यांच्या या भूमिकेला परिसरातील ज्येष्ठांनी देखील उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला असून, महिला वर्गाचा मोठा प्रतिसाद त्यांना मिळत आहे. नेवाळेवस्ती, हरगुडेवस्ती, कोयनानगर, घरकुल, अजंठानगर, पूर्णानगर आणि फुलेनगर यांसारख्या प्रमुख भागांमध्ये त्यांनी पदयात्रा काढून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रभाग ११ चा सर्वांगीण विकास आणि येथील मूलभूत प्रश्न मार्गी लावून एक सकारात्मक बदल घडवण्यासाठी आपण सज्ज असल्याचे मयुरी साने यांनी यावेळी ठामपणे सांगितले. उच्चशिक्षित आणि मनमिळावू, सर्वसमावेशक चेहरा यामुळे मयुरी ताईंना संधी मिळेल असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महापालिकेतून राबिण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील महिलांना पोहोचवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. प्रचार दौऱ्यामुळे प्रभागातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, साने यांच्या 'परिवर्तन' या घोषणेला मतदारांकडून विशेष पसंती मिळताना दिसत आहे.

> दुर्लक्षित असलेले अजंठा नगरचा मूलभूत सुविधा विकास, पाणी प्रश्न, अंतर्गत रस्ते, घरकुल वासियांच्या समस्या , बचत गटांचे एकत्रीकरण करून उद्योग व्यवसायाला वाढ आदी कामांवर प्राधान्याने भर देत प्रभागाचा कायापालट करण्यासाठी मी कटिबद्ध असेन.
>
> - मयुरी साने.



# दिल्लीच्या धर्तीवर हिंजवडी आयटी पार्कमध्ये ‘वर्क फ्रॉम होम’?

## हिंजवडीतील आयटी पार्कमधील प्रदूषणाची समस्या गंभीर बनल्याने येथील कर्मचाऱ्यांनाही घरून काम देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

दिल्लीत प्रदूषणाची पातळी वाढल्याने सरकारी आणि खासगी कार्यालयांतील ५० टक्के कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम म्हणजेच घरून काम करण्याची मुभा देणे बंधनकारक करण्यात आले आहे. आता हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील प्रदूषणाची समस्या गंभीर बनल्याने येथील कर्मचाऱ्यांनाही घरून काम देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पुणे परिसरात हिंजवडी आयटी पार्कमध्ये प्रदूषणाची पातळी सर्वाधिक आहे. येथील हवा गुणवत्ता निर्देशांकाने तीनशेची पातळी ओलांडली असून, हवेची गुणवत्ता अतिखराब पातळीवर पोहोचली आहे. दिल्लीतील प्रदूषण वाढल्यानंतर तेथील सरकारने सरकारी आणि खासगी कार्यालयांतील ५० टक्के मनुष्यबळाला घरून काम देणे बंधनकारक केले. याचे पालन न करणाऱ्या कार्यालयांवर कारवाई करण्याची तंबीही देण्यात आली आहे. आता हिंजवडी आयटी पार्कमधील वाढत्या प्रदूषणामुळे येथील आयटी कर्मचाऱ्यांकडून घरून काम देण्याची मागणी करण्यात आली आहे. याआधी हिंजवडी आयटी पार्कमधील अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी यामुळे आयटी कर्मचाऱ्यांनी घरून काम देण्याची मागणी केली होती.

आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा दिल्यास रस्त्यांवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. आयटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्यक्ष कार्यालय आणि घरून काम अशा संमिश्र पद्धतीचा अवलंब कंपन्यांनी करायला हवा. याचवेळी शासकीय यंत्रणांनी प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी आणि जलद उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

याला मुख्यतः या भागात होत असलेले मोठ्या बांधकाम प्रकल्पांचे २४ तास सुरू असलेले काम आणि रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प कारणीभूत आहेत. तसेच वाहनांमुळे होणारे प्रदूषणही त्यात भर घालत आहे. त्यामुळे बांधकामावर नियंत्रण आणून प्रदूषण नियमांचे पालन आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना करायला हव्यात.



### जलद उपाययोजना आवश्यक

» याबाबत फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज महाराष्ट्रचे अध्यक्ष पवनजित माने म्हणाले की, आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनियोजित पद्धतीने सुरू असलेल्या विकासामुळे हवा प्रदूषणाची समस्या गंभीर बनली आहे. आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा दिल्यास रस्त्यांवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. आयटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्यक्ष कार्यालय आणि घरून काम अशा संमिश्र पद्धतीचा अवलंब कंपन्यांनी करायला हवा. याचवेळी शासकीय यंत्रणांनी प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी आणि जलद उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

### आरएमसी प्रकल्प बंद करा

» याविषयी हिंजवडी एम्प्लॉईज अँड रेसिडंट्स ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेंद्र हुलसुरे म्हणाले की, थंडीच्या दिवसात इतर भागांप्रमाणेच हिंजवडी आयटी पार्कमधील प्रदूषणाची पातळी वाढली आहे. प्रदूषणाचा त्रास हा स्थानिक रहिवाशांना जास्त होत आहे. याला मुख्यतः या भागात होत असलेले मोठ्या बांधकाम प्रकल्पांचे २४ तास सुरू असलेले काम आणि रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प कारणीभूत आहेत. तसेच वाहनांमुळे होणारे प्रदूषणही त्यात भर घालत आहे. त्यामुळे बांधकामावर नियंत्रण आणून प्रदूषण नियमांचे पालन आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना करायला हव्यात. सध्या तातडीने अनधिकृत आरएमसी प्रकल्प बंद करणे आणि कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा देणे आवश्यक बनले आहे.

### शासकीय यंत्रणांकडून कारवाई

» हिंजवडी आयटी पार्क परिसरात मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्पांची कामे सुरू आहेत. यामुळे आरएमसी प्रकल्पही या परिसरात मोठ्या संख्येने आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील चार विकासकांना प्रदूषण नियमांचा भंग केल्याप्रकरणी नुकत्याच नोटिसा बजावल्या आहेत. याचवेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरएमसी प्रकल्पांची तपासणी सुरू केली असून, प्रदूषण करणारे प्रकल्प बंद करण्याची कारवाई केली जात आहे.

---

# निवडणूक कामासाठी गैरहजर; कनिष्ठ अभियंता निलंबित

## पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूकविषयक कर्तव्यासाठी हजर न राहिल्याच्या कारणावरून सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता अस्मिता गाडीवडर यांचे निलंबन करण्यात आले आहे. पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, मनुष्यबळ व्यवस्थापन कक्षाचे उपायुक्त प्रशांत ठोंबरे यांनी तत्काळ प्रभावाने निलंबनाचे आदेश बजावले आहेत.

पुणे महापालिकेच्या २०२५-२६ या कालावधीतील सार्वत्रिक निवडणुकीची प्रशासकीय व प्रत्यक्ष कार्यवाही सध्या जोरात सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी महापालिकेच्या विविध विभागातील, तसेच इतर शासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवा निवडणूक कामासाठी उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयातील निवडणूक विषयक कर्तव्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंता अस्मिता गाडीवडर यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्यांना बजावलेल्या आदेशानुसार त्या संबंधित ठिकाणी कर्तव्यावर हजर राहिल्या नाहीत.




निवडणूक कामकाज हे राष्ट्रीय कर्तव्य मानले जाते. महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम १४ मधील तरतुदी, तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या आधारे ही जबाबदारी कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात येते. या आदेशांचे पालन न केल्यास प्रशासनाकडून कठोर कारवाई केली जाण्याची तरतूद आहे. गाडीवडर यांनी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता किंवा समाधानकारक कारण न देता कर्तव्यावर अनुपस्थिती दर्शविल्याने निवडणूक प्रक्रियेत अडथळे निर्माण झाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

### कामात कसूर; कठोर कारवाई करणार

» दरम्यान, निवडणूकविषयक कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात पुढील काळातही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व वेळेत पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार

## नगरपालिकेनंतर आता झेडपीवर 'कृष्णा-भीमा'चा डोळा; भाजप आणि मित्रपक्षांच्या एकजुटीमुळे राष्ट्रवादीसमोर मोठे आव्हान.

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची आचारसंहिता कधी लागणार, याकडे इच्छुक उमेदवारांचे डोळे लागले असून तालुक्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत चालले आहे. जिल्हा परिषदेचे गट बदलले. मतदारसंघांची पुनर्रचना झाली. त्यामुळेच राजकीय समीकरणे नव्याने मांडली जात असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.मागील कार्यकाळात इंदापूर तालुक्यात ७ जिल्हा परिषद सदस्य व १४ पंचायत समिती सदस्य असे चित्र होते.

मात्र, नव्या पुर्नरचनेनुसार आता तालुक्यात ८ जिल्हा परिषदेचे गट निर्माण करण्यात आले आहेत. यामध्ये भिगवण- शेटफळगडे, पळसदेव- बिजवडी, माळवाडी- वडापुरी, निमगाव केतकी- शेळगाव, बोरी- वालचंदनगर, लासुर्णे- सणसर, काटी- लाखेवाडी आणि बावडा- लुमेवाडी या नव्या गटांचा समावेश आहे. या बदलामुळे इच्छुकांची संख्या प्रचंड वाढली असून प्रत्येक गटात उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे.




### नेत्यांकडे जोरदार फिल्डिंग

» दरम्यान, या आठवड्यात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता वर्तवली जात असून त्याआधी इच्छुकांची आपापल्या नेत्यांकडे जोरदार राजकीय पळापळ सुरू आहे. भेटीगाठी, बैठका, शक्तिप्रदर्शन आणि समीकरणे जुळवण्याचे प्रयत्न वेगाने सुरू असले तरी इंदापूर तालुक्यातील ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार असून संपूर्ण राज्याचे लक्ष लढतीकडे लागणार, यात मात्र कोणतीही शंका नाही.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जिल्हा परिषद व पंचायत समिती दोन्ही स्तरांवर इच्छुकांची मोठी गर्दी उसळली आहे. जवळपास प्रत्येक गावातून इच्छुक पुढे आले असून सध्या तरी राष्ट्रवादी काँग्रेस हे इच्छुकांचे प्रमुख केंद्र बनल्याचे चित्र आहे. दुसरीकडे नुकत्याच पार पडलेल्या इंदापूर नगर परिषदेच्या निवडणुकीत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, भाजप नेते प्रवीण माने,

माजी आमदार यशवंतराव माने व प्रदीप गारटकर यांनी एकत्र येत कृष्णा भीमा विकास आघाडी उभी केली होती. या आघाडीने नगरपालिकेच्या रिंगणात उतरून सत्ताधाऱ्यांना जोरदार आव्हान दिले. राजकीय ताकद दाखवून दिली. हाच आत्मविश्वास घेऊन कृष्णा- भीमा विकास आघाडी आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठीही दंड थोपटून पुढे येताना दिसत आहे. त्यामुळे झेडपी निवडणुकीत चुरस होणार आहे. इंदापूर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची आचारसंहिता कधी लागणार, याकडे इच्छुक उमेदवारांचे डोळे लागले असून तालुक्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत चालले आहे. जिल्हा परिषदेचे गट बदलले. मतदारसंघांची पुनर्रचना झाली. त्यामुळेच राजकीय समीकरणे नव्याने मांडली जात असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

### इच्छुकांना दोन पर्याय

» विशेष म्हणजे या आघाडीतही इच्छुकांची संख्या इतकी वाढली आहे की, उमेदवारी कुणाच्या पदरात पडणार, याचा अंदाज सध्या तरी बांधता येत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसने डावलल्यास कृष्णा भीमा विकास आघाडी हा पर्याय अनेकांना आकर्षक वाटत आहे; तर दुसरीकडे आघाडीला अपेक्षित यश मिळाल्याने राजकारणातील बुजुर्ग इच्छुकांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच ठाण मांडण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

### झेडपी निवडणुकीत चुरस

» माजी आमदार यशवंतराव माने व प्रदीप गारटकर यांनी एकत्र येत कृष्णा भीमा विकास आघाडी उभी केली होती. या आघाडीने नगरपालिकेच्या रिंगणात उतरून सत्ताधाऱ्यांना जोरदार आव्हान दिले. राजकीय ताकद दाखवून दिली. हाच आत्मविश्वास घेऊन कृष्णा- भीमा विकास आघाडी आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठीही दंड थोपटून पुढे येताना दिसत आहे. त्यामुळे झेडपी निवडणुकीत चुरस होणार आहे.

# रुपाली चाकणकर यांना न्यायालयात खेचणार; रोटीतील महिलांचा संतप्त इशारा

## रोटमलनाथ मंदिर ट्रस्टचे ऐतिहासिक दाखले; सक्तीच्या आरोपांनी समाजाची आणि परंपरेची बदनामी झाल्याचा ग्रामस्थांचा दावा.

**पुणे | प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील रोटी येथील ग्रामदैवत श्री रोटमलनाथ मंदिरात होत असलेल्या ऐतिहासिक पारंपरिक जावळ विधी कार्यक्रमाच्या संदर्भात राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी कारवाई करण्याच्या आदेशामुळे दौंड तालुक्यातील शितोळे-देशमुख घराण्यातील महिला संतप्त झाल्या आहेत. रोटी येथील रविवार (दि.२८) रोजी पार पडलेल्या निषेध सभेत चाकणकर यांनी माफी मागावी अन्यथा त्यांना न्यायालयात खेचू, असा इशारा महिलांनी दिला आहे.

दौंड तालुक्यातील रोटी येथील श्री रोटमलनाथ मंदिरात पडणाऱ्या पारंपरिक जावळ विधीत महिलांना



जबरदस्तीने मुंडन करून विद्रूप केले जाते. या प्रकरणाची चौकशी करून सात दिवसात कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पुणे जिल्हाधिकारी यांना नुकतेच दिले होते. महिला आयोगाचे अध्यक्ष चाकणकर यांनी घेतलेल्या भूमिकेचा तीव्र पडसाद दौंड तालुक्यात आणि रोटी गावात उमटले आहेत.

रोटमलनाथ मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी सचिन शितोळे म्हणाले की, ८०० वर्षांपूर्वीचे मंदिर आहे. रोटमलनाथ मंदिरात जावळचा प्रथा कायम स्वरूपाची आहे. रोटी गावातील ५०० वर्षापासून जावळ इतिहास आहे. मुलाचे जावळ, आईचे मुंडण करण्याची प्रथा आहे. घरात पहिला मुलगा होईल त्यावेळी मंदिरात मामाच्या मांडीवर बसून जावळ होत आहे. यावेळी मुलाची आई ही बट किंवा मुंडण केले जाते. ही परंपरा अनेक वर्षांची आहे.

यावेळी कुरकुंभच्या महिला पोलीस पाटील रेश्मा शितोळे म्हणाले की, जावळ काढण्याची पद्धतीबाबत आम्हाला अभिमान आहे. आमच्यावर कुटुंबात कोणतीही जबरदस्ती केली जात नाही. आमची अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे. माझे १० वर्षांपूर्वी जावळ झाले आहे. मी स्वइच्छेने हा निर्णय घेतला होता. कुटुंबातील कोणीही दबाव आणला नाही.

### ऐतिहासिक दाखले देत निषेध

» तर मागील दोन दिवसांपासून समाज माध्यमावर चाकणकर यांचा निषेध करणाऱ्या पोस्ट व्हायरल झाल्या आहेत. रविवारी दि (२८) रोटी येथील रोटमलनाथ मंदिर जवळ तालुक्यातील शितोळे-देशमुख परिवाराच्या वतीने निषेध सभा पार पडली. या निषेध सभेत शितोळे घराण्यातील अनेक मान्यवरांनी जावळ विधी परंपरा काय आहे आणि ते कधीपासून रूढ आहे याचाही ऐतिहासिक दाखले देत रूपाली चाकणकर यांचा निषेध केला.